# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी **Year (वर्ष):** 2019
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0045 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/02/2019 00:41 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(A) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 14/02/2019
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/02/2019
**Time From (वेळेपासून):** 15:59 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:48 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/02/2019 **Time (वेळ):** 23:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 050 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/02/2019 23:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.5 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** करवीर तहसीलदार कार्यालय , कोल्हापूर ,करवीर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** श्री बाळू राऊ पाटील
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1954 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कंदलगाव कोल्हापूर ,करवीर,करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कंदलगाव कोल्हापूर ,करवीर,करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जयवंत आबाजी तोडकर | | वडील का नाम : आबाजी तोडकर | 1. हनुमान गल्ली,बालिंगा ,कोल्हापूर ,करवीर ,करवीर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या भारतीय चलनी नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

मी श्री. बाळु राऊ पाटील, वय- 65, व्यवसाय- शेती, रा. कंदलगाव, ता. करवीर, जि. कोल्हापुर मोबाईल नंबर- 7420976979 समक्ष हजर राहुन देतो फिर्याद अशी की, मी वरील गांवचा रहिवाषी असुन घरी मी माझे कुटूंबीयांसह राहणेस आहे. मी शेती व्यवसाय करतो. मला दोन मुले व एक मुलगी अशी अपत्ये आहेत. माझी विवाहीत मुलगी श्रीमती राजश्री शिवाजी पिष्टे, रा. केर्ले. ता.करवीर येथे रहावयास असुन जावई श्री शिवाजी जालींदर पिष्टे हे 23 फेब्रुवारी-2018 रोजी मयत झाले आहेत. माझी विधवा मुलगी सौ. राजश्री हिस दोन मुले आहेत. माझी मुलगी श्रीमती राजश्री हिच्या सासु, सासरे यांचे सामाईक रेशनकार्ड मध्ये तिचे व तिच्या दोन मुलांची नांवे आहेत. पण मुलगी राजश्री हिचे वेगळे रेशनकार्ड तिला काढावयाचे आहे. माझे विधवा मुलगीला कोणाचा आधार नसल्यानें तिचे व तिच्या मुलाचे नांवे विभक्तपणे रेशनकार्ड काढणेसाठी लागणारी कागदपत्रे घेउन मी केर्ले येथील सेतु केंद्रामध्ये दिली. सेतु केंद्रामध्ये तशी नोंद घेउन ती कागदपत्रे त्यांनी माझे हातात दिली. व मला त्यांनी ती कागदपत्रे करवीर तहसिलदार कार्यालयामध्ये पुरवठा विभागामध्ये देणेस सांगितली. त्यानंतर अंदाजे 15 दिवसापुर्वी मी ती कागदपत्रे घेउन करवीर तहसिलदार कार्यालयामध्ये गेलो होतो. व तिथे चैकशी करुन ती कागदपत्रे तेथील क्लार्क श्री तोडकर यांचे हातात दिली आहेत. त्यावेळी क्लार्क श्री तोडकर यांनी ती कागदपत्रे पाहुन तुमच्या मुलीचे विभक्त रेशनकार्ड काढुन पाहीजे असेल तर तुम्ही मला अडीच हजार रुपये दयावे लागतील असे सांगितले आहे. त्यावेळी क्लार्क श्री तोडकर हे माझेकडे लाच मागत असलेचे माझे लक्षात आले आहे. क्लार्क श्री तोडकर हे त्यांना अडीच हजार रुपये लाचेची रक्कम दिल्याशिवाय ते माझे काम करणार नाहीत याची मला खात्री झाली आहे. परंतु त्यांना लाच देणेची माझी इच्छा नाही. क्लार्क श्री तोडकर, करवीर तहसिलदार कार्यालय, यांचेत व माझेत कोणतेही आर्थीक देवघेवीचे संबध नाहीत. तसेच त्यांचेत व माझेत कोणतेही वाद नाहीत. त्यांचेवर आपले मार्फत कारवाई होणेसाठी मी हा तक्रार अर्ज देत आहे. क्लार्क श्री तोडकर यांना लाच म्हणून देण्यासाठी लागणारी रक्कम ही मी माझेजवळचे रक्कमेतील देणार आहे. तरी त्यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे. वरील प्रमाणे मजकुराची तक्रार दिनांक-14/02/2019 रोजी समक्ष अन्टी करप्शन ऑफीसमध्ये दुपारी तिन वा.चे सुमारास हजर राहुन सांगितली होती. मी इयता 2 री शिकलो असुन मला लिहता वाचता येत नसल्याचे मी पोलीस उपअधीक्षक, श्री गोडे साहेबांना सांगितलेवर त्यांनी माझी तक्रार नोंद करवुन घेतली होती. त्यानंतर गोडे साहेबांनी तेथे दोन इसमांना बोलावुन ते क्लार्क तोडकर यांचेविरुध्द कारवाई करणेकरीता बाहेरील आरोग्य सेवा,मंडळ, कोल्हापूर यांचेकडील खात्याचे दोन कर्मचारी पंच म्हणुन बोलाविले असल्याचे सांगुन त्यांची नांवे श्री नितीन रेणुसे व अमोल लोणकर असे अशी सांगुन माझी त्यांचेशी ओळख करुन दिली होती. त्यानंतर सोबत हजर असले दोन्ही पंचांना श्री गोडे साहेबांनी सापळा कारवाईकरीता पंच म्हणून काम करण्यास तयार आहात काय? अषी विचारणा केली असता, त्यास दोन्ही पंचांनी होय तयारी आहे असे सांगितले. त्यानंतर गोडे साहेबांनी माझी तक्रार पंचाना तोंडी सांगणेस सांगितली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचाना तोंडी सांगितली व माझी टाईप करुन घेतलेली तक्रार पंचाना

वाचण्यास दिली. त्यावेळी मी तोंडी सांगितलेली तक्रार व टाईप केलेली तक्रार ही एकच असल्याची खात्री झालेवर त्या तक्रारीवर गोडेसाहेबांनी व पंचानी सह्या केल्या. त्यांनतर गोडेसाहेबांनी मला माझे तक्रारी प्रमाणे तहसिलदार कार्यालयातील क्लार्क श्री तोडकर हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची प्रथम पडताळणी करणार असलेचे सांगीतले. तसेच मला पंचासमक्ष डिजीटल रेकर्डर चालू-बंद करणेचे प्रात्यक्षिक दाखविले व मला ते समजलेची खात्री केली. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. रेणुसे तसेच त्यांचेकडील पोलीसांना पडताळणी पंचानाम्याबाबतच्या सुचना दिल्या. माझे गळयामध्ये डिजीटल व्हईस रेकर्डर अडकविला व चालु करुन माझेसोबत पंच नं.1 श्री रेणुसे यांना क्लार्क श्री तोडकर यांची भेट घेण्यासाठी पायी चालत पावणे चार वा.चे सुमारांस करवीर तहसिलदार ऑफीसमध्ये पाठविले. आम्ही पायी चालत करवीर तहसिलदार ऑफीसमधील पुरवठा विभागामध्ये गेलेवर तेथे आंतील बाजुस असले खोलीमध्ये क्लार्क तोडकर दिसले. त्याना मी आमचे पिष्टयांच पंधरा दिवस झाल काम देवुन असे बोललेवर क्लार्क तोडकर यांनी माझेशी बोलणी करुन माझेकडे अडीच हजार रुपयाची लाचेची मागणी केली व सोमवारी 18/02/2019 रोजी रक्कम घेउन रेशनकार्ड नेण्यासाठी येणेस सांगितले होते. त्यानंतर गोडे साहेबांचे सुचनेप्रमाणे मी व पंच श्री रेणुसे असे तिथुन पायी चालत अन्टी करप्शन आफीसमध्ये चार वाजण्याचे दरम्यान परत आलो. त्यावेळी गोडेसाहेबांनी माझे गळयामध्ये अडकविलेला रेकर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर गोडेसाहेबांनी मला त्यांचे केबीनचे बाहेर थांबणेस सांगितले व पंच नं.1 श्री रेणुसे यांना आत बोलाविले व थोडयावेळाने रेणुसे यांना बाहेर पाठवुन मला आंत बोलाविले व त्यांनी माझेकडे तहसिलदार कार्यालयामध्ये गेलेवर काय काय घडले व याबाबत विचारपूस केली. त्यावेळी मी त्यांना क्लार्क श्री तोडकर यांनी रेशनकार्ड काढुन देणेसाठी अडीच हजार रुपये लाच मागणी केली असल्याचे सर्व सविस्तर हकीगत सांगितली. त्यानंतर गोडेसाहेबांनी रेकर्डडर सुरु करुन आमचेसमक्ष त्यामधील टेप झालेले बोलणे ऐकले असता, त्यामध्ये माझेत व क्लार्क श्री तोडकर यांचेत लाचेच्या मागणी बाबत बोलणे टेप झालेले ऐकुन समजुन आले. माझे व पंच नं. 1 यांचे सांगणेवरून तसेच डिजीटल व्हईस रेकर्डर मध्ये टेप झालेल्या बोलण्यावरुन क्लार्क श्री तोडकर यांनी माझे मुलीचे तसेच नातवांची नावे सासुसास-याचे सामाईक रेशनकार्डावरुन कमी करुन माझे मुलीचे व नातवांचे नावाचे नवीन रेशनकार्ड तयार करुन देण्याचे काम करुन देणेसाठी अडीच हजार लाचेची मागणी केली असल्याचे व त्यामध्ये काय तरी कमी करतो या मामा सोमवारी असे म्हणाले असल्याचे समजुन आले. त्यानंतर गोडे साहेबांनी तसा पंचनामा केला व आपण सोमवारी 18 तारखेला मुंबई येथे सरकारी कामासाठी जाणार असल्यानें शनिवारी दि. 16 तारखेला सापळा कारवाई करुया असे ठरवुन मला व पंचाना संध्याकाळी 7 वाजल्यानंतर घरी जाणेस सांगितले होते. त्यानंतर शनिवारी 16 तारखेला माझेच अर्जंट काम निघाल्यामुळे मी अन्टी करप्शन ऑफीसला येउ शकत नाही असे गोडेसाहेबांना निरोप दिला व क्लार्क श्री तोडकर यांनी मला सोमवारी लाचेची रक्कम घेउन येणेस सांगितलेमुळे मी सोमवारी येतो असे सांगितले होते. त्यावेळी गोडेसाहेबांनी सोमवारी या व पुढची कारवाई पोलीस निरीक्षक श्री मारुती पाटीलसाहेब हे करतील असे सांगितले. त्यानंतर आज सोमवारी 18 तारखेला माझे घरातील शेतीची कामे निघालेमुळे मी दुपारी सव्वा तिनच्या सुमारास अन्टी करप्शन ऑफीस कार्यालयामध्ये गोडेसाहेबांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी तेथे हजर असलेले स्टाफपैकी एका अधिका-याने मला नाव विचारले त्यांना मी नांव सागितलेवर त्यांनी आपली ओळख पो.नि. श्री मारुती पाटील अशी सांगुन पंच नं. 1 श्री रेणुसे व पंच नं.2 श्री लोणकर यांची ओळख सांगितली तसेच त्यांचे स्टाफमधील तिथे हजर लोकांची ओळख करुन त्यांची नावे सहायक फौजदार श्री मनोहर खनगांवकर, पोलीस नाईक श्री शरद पोरे व नवनाथ कदम, पो.क श्री मयुर देसाई अशी असल्याचे सांगितले. व करवीर तहसिलदार आफीसमधील पुरवठा विभागामध्ये क्लार्क श्री तोडकर यांच्याविरुध्द सापळा कारवाई करणेचे सर्वानुमते ठरविले .त्यावेळी पाटीलसाहेबांनी मला क्लार्क श्री तोडकर हे आफीसमध्ये आहेत काय? खात्री करणेसाठी फोन करणेस सांगितलेवर मी क्लार्क श्री तोडकर यांनी मला लिहुन दिलेला नंबरवर फोन केला. परंतु तो फोन त्यांनी घेतला नाही. त्यानंतर मला व पंचाना व पोलीस स्टाफला श्री मारुती पाटीलसाहेबांनी सापळापुर्व व सापळा पंचनाम्याचे महत्व सांगून पंचनामा सूरु केला. त्यावेळी त्यांनी मला व पंचाना अल्ट्राव्हायोलेट दिवा व अंथ्रासिन न पावडरचे गुणधर्म व महत्व समजावून सांगितले. त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी पाचशे रुपये दराच्या 5 नोटा असे एकुण रुपये अडीच हजार रुपये मी पाटील साहेबांचेकडे हजर केले. त्यानंतर नोटांचे नंबर को-या कागदावर लिहुन तो कागद पंच नं. 2 लोणकर यांचेकडे दिला. तसेच टेबलावर कोरा कागद पसरुन हाताचे बोटाने नोटांचे दोन्ही बाजूस पोलीस श्री नवनाथ कदम यांनी डबीमधील अंथ्रासिन पावडर लावली आणि त्या नोटा माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर पाटीलसाहेबांनी सापळा कारवाईबाबत मला, पंच व त्यांचेसोबतचे कर्मचारी यांना योग्य त्या सुचना देवून क्लार्क तोडकर यांनी माझेकडून लाचेची रक्कम घेतल्यावर मी तिथुन बाहेर येउन माझे खिशातील चष्मा डोळयावर घालायचा म्हणजे तो क्लार्क तोडकर यांनी पैसै घेतल्याचा इशारा समजला जाईल व आपण तिथे आजुबाजुला लपुन थांबणार आहोत.व तुम्ही इशारा केलेवर आम्ही क्लार्क तोडकर याला पकडणार आहोत. असे मला व पंच नं. 1 श्री रेणुसे यांना सांगितले. त्याचवेळी साडेचार वा.चे सुमारास क्लार्क श्री तोडकर यांनी माझे मोबाईलवर फोन करुन मी ऑफीसला आलोय तुम्ही या असा फोन केलेवर लागलीच डिजीटल व्हईस रेकर्डर सुरु करुन तो माझ्या गळयात शर्टचे आतील बाजुस कोणास दिसणार नाही अशा रितीने चालू करुन अडकविला व मला पंच नं. 1 यांचे सोबत क्लार्क श्री तोडकर यांची भेट घेण्यासाठी पावणेपाच वा. चे सुमारास पाठविले.पुरवठा विभागामध्ये जाउन क्लार्क श्री तोडकर यांची मी व पंच नं. 1 रेणुसे असेंनी भेट घेतली असता, त्यांचेशी आमचे कामासंबधी बोलणी केलेवर जुन पण हाय व नवीन पण हाय असे बोलुन माझे मुलीचे सासरकडील जुने रेशनकार्ड व नवीन विभक्तपणे केलेले नवीन कार्ड अशी दोन्ही कार्ड माझे हातात दिली. त्यावेळी मी त्यांना पाशे कमी करु नव्ह असे म्हणालेवर त्यांनी केलासा, बर दया, दया आसु दे असे म्हणाले किती हायत मापुन घ्या असे म्हणालेवर त्यांनी पंधरा असे म्हणालेवर मी आणखी पाचशे रुपये त्यांना दिले. एकुण दोन हजार रुपये रक्कम माझे शर्टाचे डावे बाजुचे खिशातुन तोडकर यांचेसमोर धरली असता ती रक्कम त्यांनी उजव्या हाताने घेतली आणि त्यांचे पन्टचे मागील उजवे बाजुचे खिशात ठेवली. मी बरोबर हाय असे म्हणालेवर त्यांनी हु असे म्हणाले. त्यानंतर मी तिथुन बाहेर येउन ठरल्याप्रमाणे इशारा म्हणुन माझे विजारीचे खिशातील चष्मा काढुन तो माझे डोळयावर घातला. त्यानंतर पाटीलसाहेब व त्यांचेकडील साध्या ड्रेसमधील स्टाफ हे आम्ही उभारले ठिकाणी येवुन पोनि.पाटील यांनी माझे गळयातील डिजीटल व्हाईस रेकर्डर बंद करुन ताब्यात घेतला. व तेथुन आंत जाउन क्लार्क श्री तोडकर यांना पकडले. तसेच क्लार्क तोडकर यांनी स्विकारलेली लाच रक्कम रुपये 2000/- पंच साक्षीदारांचे समक्ष जप्त करुन त्यांचे ताब्यात घेतली. त्यानंतर पाटीलसाहेबांचेकडून तोडकर हे क्लार्क नाहीत व ते खाजगी उमेदवार म्हणुन काम करीत असल्याचे मला समजले. तसेच त्यांचे नांव श्री जयवंत आबाजी तोडकर, वय-41, रा.हनुमान गल्ली, बालिंगा, ता. करवीर जि. कोल्हापूर यांनी असे असल्याचे समजुन आले. तरी माझी मुलगी श्रीमती राजश्री शिवाजी पिष्टे, रा. केर्ले, ता.करवीर, जि. कोल्हापूर हिचे व तिच्या मुलांचे सासरकडील सामाईक रेशनकार्डावरील नाव कमी करुन विभक्तपणे नवीन रेशनकार्ड काढुन देणेसाठी खाजगी उमेदवार श्री जयवंत आबाजी तोडकर, वय-41, रा.हनुमान गल्ली, बालिंगा, ता. करवीर जि. कोल्हापूर यांनी माझेकडे गुरुवारी 14/02/2019 रोजी अडीच हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्यानंतर आज सोमवार तारीख 18/02/2019 रोजी तडजोडीअंती माझेकडे दोन हजार रुपये मागणी करुन ती रक्कम करवीर तहसिलदार ऑफीसमधील पुरवठा विभागामध्ये माझेकडून घेतलेवर पावणेपाच वा.चे सुमारांस त्याला अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पाटीलसाहेब व त्यांचे पथकाने रंगेहात पकडलेने त्यांचेविरुध्द माझी फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): मारुती पाटील PI अँन्टी करप्शन ब्युरो **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे ~~shivaji rajar~~am **Rank** (पद): PC (Police Constable)

**No.**(क्र.): 12601000362srh **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा): बाबुराव पाटील

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VASANTRAO DADASO BABAR

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMH75973